**सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पॅरामेडिकल गटातील प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन/ अधिकच्या तुकड्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०२४/प्र.क्र.७३/उद्योजकता,**
मंत्रालय मुख्य इमारत (खोली क्र.२०४), २ रा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०२४

<u>वाचा</u>:

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:व्हीओसी-२०१२/५९१/ प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि. १६ जानेवारी, २०१३
२) महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. २० जानेवारी, २०२२ रोजी प्रसिद्ध झालेला महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१
३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग अधिसूचना क्र.व्हिओसी-२०२०/ प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि. २५ जानेवारी, २०२२
४) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र जा.क्र. मरोकौविमं /का-१/मान्यता विभाग/२०२१-२२/ १५१, दि.३१ जानेवारी, २०२२
५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२०/प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.१६ फेब्रुवारी, २०२२
६) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र क्र.बैठक/ का.क्र.१२/२०२३/३०३, दि.३१ मार्च, २०२३
७) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र क्र.का. क्र.०१/मान्यता/२०२४/१२४३, दि.२४ जुलै, २०२४

**<u>प्रस्तावना</u>:**

औद्योगिकरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल या बाबींचा विचार करता अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच विशिष्ट शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी (ॲड-ऑन कोर्सेस) कमी कालावधीचे व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करुन अशा विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारास चालना (Employability) मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक असणा-या व्यवसाय शिक्षणाची गरज भागविण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली सन १९८६ मध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण मंडळाची ( सध्याचे नाव महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ ) स्थापना झाली. या मंडळामार्फत रोजगार व स्वयंरोजगार या उद्दिष्टपूर्तीसाठी व्यवसायभिमुख अभ्यासक्रम चालविण्यांत येतात. औद्योगिककरणातील वाढ, बदलते

तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल इत्यादींमुळे मंडळाच्या अभ्यासक्रमांत कालानुरुप सुधारणा तसेच वाढ करुन सद्यस्थितीत मंडळामार्फत विविध गटातील ६ महिने, १ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अंशकालीन व पूर्णवेळ स्वरुपाचे असे अभ्यासक्रम राबविण्यांत येत आहेत.सदर अभ्यासक्रम चालविण्यासाठी इच्छुक खाजगी संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पॅरामेडिकल गटातील अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी इच्छुक असलेल्या खाजगी संस्थांकडून प्राप्त अर्जाची संबंधित जिल्हयाच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेमार्फत तपासणी व निरीक्षण करून मंडळाकडे पात्र संस्थेची शिफारस केली आहे. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत करून पात्र संस्थांची यादी शासन मान्यतेसाठी संदर्भाधीन क्र.७ येथील पत्रान्वये सादर करण्यात आली आहेत. त्यानुसार सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पॅरामेडिकल गटातील प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या नवीन संस्था /अधिकच्या तुकडयांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम पॅरामेडिकल गटातील राबविण्यास इच्छुक असलेल्या खाजगी शैक्षणिक संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांची छाननी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत करून, त्यानुसार आवश्यक मानकांची पूर्तता करणाऱ्या संस्थेस मंडळाचे पॅरामेडिकल गटातील प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्याबाबतची शिफारस मंडळामार्फत करण्यात आली. त्या संस्थांचा तपशिल सोबतच्या **प्रपत्र "अ"** मध्ये सोबत जोडण्यात आला असून, सदर संस्थांना सन २०२४-२५ पासून मंडळाचे **पॅरामेडिकल** गटातील प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम नवीन संस्थेत नवीन/ अधिकच्या तुकडयांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम राबविणास मान्यता देण्यात आलेल्या संस्थांना शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ तसेच, संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबधित कार्यालये यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थांना, ज्या जागेत मान्यता देण्यात आलेली आहे त्याच जागेत विद्यार्थी प्रवेश करण्यात यावेत. तसेच त्याच जागेचा मान्यतेबाबत विचार करण्यात येईल, जर जागेत बदल आढळल्यास मान्यता रद्द करण्यात येईल.

३. सदर संस्थेस अभ्यासक्रम चालविण्यासाठीची मान्यता ही संस्थेने जागेसंबंधी सादर केलेल्या दस्ताऐवजामधील एकूण क्षेत्रफळांचे आणि नकाशा मधील उपलब्ध जागेच्या आधारे देण्यात येत आहे.

४. सदर संस्थेस महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम सुरु करण्यास स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यात येणार नाही. तसेच, या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, तसेच शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क चा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

५. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करण्यासाठी गठीत समितीच्या शिफारशीनुसार निर्धारित करण्यात आलेले प्रशिक्षण शुल्क उक्त संस्थांना लागू राहील. निर्धारित केलेल्या प्रशिक्षण शुल्कापेक्षा अधिकच्या प्रशिक्षण शुल्काची आकारणी करता येणार नाही.

६. सदर अभ्यासक्रमांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा/वेतन व तद्अनुषंगीक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. याबाबत शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

७. सदर संस्थेस अर्ज केलेल्या प्राप्त नस्तीमधील/प्रस्तावामधील अभिलेख्यानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, त्यामध्ये भविष्यात काही विसंगती/ बेकायदेशीर आढळल्यास संबंधित संस्थेतील अभ्यासक्रमांची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल आणि अशा दोषी संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८. "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता मिळालेले प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम" अशा सूचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकड्यांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता यांचा उल्लेख करण्यात यावा. संस्थेचे नाव मेडीकल/ इंजिनिअरींग/ पॉलीटेक्नीक/ आय.टी.आय. अथवा तत्सम नाव देण्यात येऊ नये आणि त्याऐवजी संस्थेच्या नावाच्या पुढे कौशल्य विकास संस्था असे नमूद करणे बंधनकारक आहे. संस्थानी अशा प्रकारे नावात बदल करून सादर न केल्यास अशा संस्थांचा मान्यतेसाठी विचार करण्यात येणार नाही. संस्थेने पायाभुत सुविधा व इतर बाबीची पुर्तता प्रस्ताव/ अर्ज सादर करतेवेळी त्यामध्ये संस्थेचे जुने नाव व सुधारीत नाव असे दोन्ही नावे नमूद करणे बंधनकारक राहील.

९. यापूर्वी उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक: व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५ (क)/ व्यशि-४, दि.१६ जानेवारी, २०१३ अन्वये, आवश्यक ती अनामत रक्कम रोखीने चलनाद्वारे अथवा बॅक गॅरटीच्या स्वरुपात भरण्याची तरतूद करण्यात आली होती. तथापि, मंडळाचे पत्र क्र.बैठक/का.क्र.१२/२०२३/३०३, दि.३१.०३.२०२३ नुसार मान्यता देण्यात आल्याप्रमाणे अनामत रक्कम मंडळाच्या बचत बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने संबंधित मान्यता प्राप्त संस्थेने भरणे आवश्यक राहील.

१०. मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नवीन तुकडयांची प्रवेशक्षमता प्रती तुकडी ३० इतकी राहील.

११. संस्थेने विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेश केल्यास, किंवा मंजुरी पेक्षा ज्यादा प्रवेश केल्यास असे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही. याकरीता संस्थेस "महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३" लागू राहील.

१२. मान्यताप्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरू न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

१३. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात शासनाने राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) नुसार बदल केल्यास त्याप्रमाणे अभ्यासक्रम राबविणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१४. पॅरामेडिकल गटातील अभ्यासक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आलेल्या संस्थांनी आवश्यक त्या ठिकाणी वैद्यकिय क्षेत्रातील संबंधित परिषद/मंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

१५. पॅरामेडिकलच्या पदविका ( Diploma ) व प्रमाणपत्र ( Certificate ) स्तरावरील अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार हे आरोग्य सहाय्यक म्हणुन काम करण्यास पात्र राहतील.

१६. पॅरामेडिकलच्या पदविका ( Diploma ) व प्रमाणपत्र ( Certificate ) स्तरावरील अभ्यासक्रम हे वैद्यकिय अभ्यासक्रम नाहीत व उमेदवार कोणत्याही रुग्णास कोणतेही औषधे लिहून देण्यास (Prescribe drugs ) पात्र असणार नाहीत.

१७. पॅरामेडिकलच्या पदविका (Diploma) व प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवारांना "डॉक्टर (Doctor)" ही उपाधी (Title) लावण्यास मनाई राहील.

१८. संस्थेकडून आभासी वर्गाची (Virtual Classroom) निर्मिती करण्यात यावी.

१९. संस्थेकडून कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्याचे सिध्द झाल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल.

२०. मान्यता दिलेल्या संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले आहेत तसेच अभ्यासक्रमनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांनी शासनास दोन महिन्यात सादर करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२४०९१३१७४०१५६००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA AMIT KARANDE

Digitally signed by MANJUSHA AMIT KARANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=4b1c1c68b2fb7d60932c7a539658f299af288eb5fbe81ceb2178b5deea6f7a28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC8432DE7E7323854E5E7499C63951988287A093EF9B088F4B029753EA90109, cn=MANJUSHA AMIT KARANDE
Date: 2024.09.13 17:40:40 +05'30'

**( मंजुषा कारंडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (कौ.रो. उ. व ना.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

| कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.व्हिओसी-२०२४/प्र.क्र.७३/उद्योजकता, दि.१३ सप्टेंबर, २०२४, सोबतचे "प्रपत्र-अ" | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक सन २०२४-२५ करीता मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम प्रथमच नवीन संस्थेत नव्याने सुरु करण्यासाठी/जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे/जुन्या संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या | | | | | |
| (अभ्यासक्रम गट-पॅरामेडिकल गट) | | | | | |
| अ.क्र. | विभाग | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता (संस्था संकेतांक जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम व तुकडी वाढकरिता) | मान्यतेचा प्रकार | तुकडी संख्या |
| **९** | **अभ्यासक्रमाचे नाव - डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष** | | | **अभ्यासक्रम संकेतांक - २०१४०४** | |
| १ | मुंबई | ठाणे | जीवन-दीप शैक्षणिक संस्था पोई संचलित जीवनदीप कौशल्य विकास संस्था, गोवेली, पो.- रायते, ता.- कल्याण, जि.- ठाणे - ४२११०३ | नवीन संस्था | ०१ |
| २ | मुंबई | रत्नागिरी | रॅलिस फौंडेशन संचलित रॅलिस पॅरामेडिकल कौशल्य विकास संस्था, आदर्श विद्यामंदीर व ज्युनिअर कॉलेज, बिल्डींग नं. २, वाटूळ, ता. राजापूर, जि. रत्नागिरी ४१५६४३ | नवीन संस्था | ०१ |
| ३ | नाशिक | नंदुरबार | आदर्श फाऊंडेशन संचलित आदर्श इन्स्टिट्युट ऑफ पॅरामेडीकल सायन्स अँन्ड स्किल डेव्हलपमेंट, आदर्श फाऊंडेशन बोरविहीर, पो- रायपुर, बारी रोड, जि.प. प्राथमिक शाळेजवळ, ता- नवापुर, जि- नंदुरबार- ४२५४१८ | नवीन संस्था | ०१ |
| ४ | नाशिक | नंदुरबार | कै. सुमनबाई एज्युकेशन संस्था संचलित कै. एस.पी.एस. टेक्निकल अँन्ड पॅरामेडीकल स्किल व्होकेशनल एज्युकेशनल अँन्ड ट्रेनिंग इन्स्टिट्युट, पहिला मजला आणि दुसरा मजला दोंडाइचा रोड, कंलदर शहा दर्गाह शहादा (उपकार बिल्डिंग) मु.पो- शहादा, ता- शहादा, जि- नंदुरबार- ४२५४०९ | नवीन संस्था | ०१ |
| ५ | नाशिक | जळगांव | अभिनव फौंडेशन संचलित अभिनव व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर, प्लॉट नं. ५८, गट नं. ३६/५, न्यु बेंडाळे नगर, मानराज पार्क जळगांव, ता.- जि.- जळगांव- ४२५००१ (संस्था कोड MSB१००४१३) | जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम | ०२ |
| ६ | पुणे | पुणे | आरोग्य मेडीकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित स्कोप स्किल डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट, ११ बी, तिसरा मजला, आदित्य बिझनेस सेंटर, पि.एच.डायगनॉस्टीकच्या वरती, कोंढवा, ता- हवेली, जि- पुणे- ४११०४८(संस्था कोड MSB१२०७६९ ) | जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम | ०१ |
| ७ | छत्रपती संभाजीनगर | बीड | राजर्षी शाहु महाराज शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजीराजे व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम केंद्र, त्रिमुर्तीनगर, वानगाव फाटा, ता.जि. बीड ४३११२६ (संस्था कोड MSB२१०३३३ ) | जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम | ०१ |
| ८ | छत्रपती संभाजीनगर | बीड | स्वराज बहु-उद्देशीय सेवाभावी संस्था खुंड्रस संचलित माऊली कौशल्य विकास संस्था (घोसापुरी) नामलगाव काटा, जि. बीड ४३११२२ | नवीन संस्था | ०२ |